"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, संचलित



# रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,

तांबरी विभाग, उस्मानाबाद–४१३५०१


visit us at : www.rpmahavidyalaya.org
E-mail Address : osdrpcollege@yahoo.com



**College with Potential for Excellence Phase - II**
**Star College Status by DBT, Govt. of India**

# माहिती पत्रक

शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४

## (कनिष्ठ महाविद्यालय)
## JUNIOR COLLEGE

ज्यू.कॉ.मान्यता क्र.: HSC/1074/1975-76 Dt.18/3/1975




मुल्य : रू. ५०/-

1631

महाविद्यालय परिसरात C.C.T.V. बसविलेले आहेत.

## संस्थेची प्रार्थना

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे
रामकृष्ण, रहिम, ख्रिस्त
बुद्ध, झरतुष्ट्र !
महावीर मानवसंत मानव्याचे दीपस्तंभ
लीन दीन होऊन त्यांचे
वंदु या चरण !
सत्य, शील, प्रामाणिकता,
त्याग पिळवणूकीस आळा
मानव्याचे अधिष्ठाण
ईशतत्व दर्शन
यांचे ज्ञान नि विज्ञान हाच सुसंस्कार
विवेकांच्या आनंदाचा लाभ शिक्षणात !

---

अग्ने नय सुपथा
रायें अस्मान्
विश्वानी देव !
वयुमानी विद्वान !
युयोध्यस्म ज्जुहुराणमेनो
भुयिष्ठां ते नमउक्तिम् विधेम
ओम् शांती: शांती !

*डॉ. बापूजी साळुंखे*

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर
## व्यवस्थापक मंडळ

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | मा.आमदार चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.नामदेव विठ्ठलराव कांबळे | उपाध्यक्ष |
| ३. | मा.लालासाहेब भानुदास यादव | उपाध्यक्ष |
| ४. | मा.प्राचार्य अभयकुमार गोविंदराव साळुंखे | कार्याध्यक्ष |
| ५. | मा.प्राचार्या सौ.शुभांगी मुरलीधर गावडे | सेक्रेटरी |
| ६. | मा.प्राचार्य डॉ.राजेंद्र विश्‍वनाथ शेजवळ | (सहसचिव, प्रशासन) |
| ७. | मा.सिताराम महारु गवळी | (सहसचिव, अर्थ.) |
| ८. | मा.खासदार संभाजीराजे शाहू छत्रपती | सदस्य |
| ९. | मा.अविनाश दिनकर पाटील | सदस्य |
| १०. | मा.सदाशिव कृष्णा कुंभार | सदस्य |
| ११. | मा.डॉ.विजयकुमार शिवाजीराव पाटील | सदस्य |
| १२. | मा.शशिकांत यशवंत काटे | सदस्य |
| १३. | मा.प्राचार्य डॉ.जयसिंगराव श्रीराम देशमुख | सदस्य |
| १४. | मा.श्रीराम शरदचंद्र साळुंखे | सदस्य |
| १५. | मा.प्रा.डॉ.मिलिंद शिवाजीराव हुजरे | सदस्य |
| १६. | मा.प्रकाश लक्ष्मण हाके | सदस्य |
| १७. | मा.प्राचार्य डॉ.रमेश राजाराम कुंभार | सदस्य |
| १८. | डॉ.महेश नारायणराव गायकवाड | सदस्य |
| १९. | श्री.नारायण शंकर पुरी | सदस्य |
| २०. | श्री.गुलाबराव जगन्नाथ बोराटे | सदस्य |

# विभाग प्रमुख यादी

| अ.नं. | विभागप्रमुखाचे नाव | विभाग |
|---|---|---|
| १) | मा.श्रीराम शरदचंद्र साळुंखे | कोल्हापूर विभाग |
| २) | मा.प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ | सातारा विभाग |
| ३) | मा.प्राचार्य मिलिंद हुजरे | सांगली विभाग |
| ४) | मा.प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख | मराठवाडा विभाग |
| ५) | मा.सिताराम महारु गवळी | पुणे विभाग |
| ६) | मा.भाऊसाहेब नानासाहेब सांगळे | रायगड विभाग |

# शालेय समिती

| शालेय समिती | | |
|---|---|---|
| अ.नं. | सभासदाचे नांव | हुद्दा |
| १. | मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे | अध्यक्ष |
| २. | मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे | सदस्य |
| ३. | मा.प्राचार्य डॉ. राजेंद्र विश्वनाथ शेजवळ | सदस्य |
| ४. | मा.प्राचार्य जयसिंगराव श्रीराम देशमुख | सदस्य सचिव |
| ५. | प्रा. बी. एस. सुर्यवंशी | सदस्य |
| ६. | श्री. एस. पी. पिंगळे | सदस्य |
| ७. | पालक प्रतिनिधी | रिक्त |

## ♦ महाविद्यालयाची ध्येय धोरणे व उद्दिष्ट्ये ♦

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' हे ब्रीद अनुसरुन महाविद्यालयाची पुढील प्रमाणे ध्येय धोरणे व उद्दिष्ट्ये आहेत.

१) ''विद्या प्रथम,शिक्षणास अग्रक्रम नंतर बाकी उपक्रम या त्रिसुत्रीचा स्विकार करुन विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमातून समर्पित व पवित्र भावनेने दर्जेदार शिक्षण देणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासणे व वाढ करणे.

३) विद्यार्थ्यामध्ये सत्य, शिल,चारित्र, त्याग व सेवावृत्ती पिळवणूक प्रवृत्तीस आळा या गुणांची वाढ करणे.

४) विद्यार्थ्यांना मुलभूत शैक्षणिक सुविधा पुरवून, सांस्कृतिक मुल्य बिंबवून सामाजिक जाणीव निर्माण करुन,सुसंस्कृत व कल्पक भारतीय नागरिक तयार करणे.

५) सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडास्पर्धा, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, वतृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्पर्धा परीक्षा व अन्य कार्यक्रमांच्या माध्यमातून वाढत्या बेकारीला आळा घालण्यासाठी सर्वसाधारण शिक्षणाला व्यवसायिक शिक्षणाची जोड देणे.

६) शक्य असणाऱ्या ठिकाणी नोकरी मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

७) शिक्षणाचे व्यावसायिकरण करुन उच्च शिक्षणावरील भार कमी करणे.

८) विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला व सुप्त गुणांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

## ♦ ११ वी कला (Arts)

**अ) आवश्यक विषय**

१) इंग्रजी २) पर्यावरण शास्त्र ३) आरोग्य व शारीरिक शिक्षण

**ब) द्वितीय भाषा**

१) मराठी २) हिंदी (या दोनपैकी एक भाषा निवडणे)

**क) ऐच्छिक विषय :**

१) इतिहास
२) राज्यशास्त्र
३) समाजशास्त्र
४) अर्थशास्त्र /सहकार (या पैकी एक विषय निवडणे) (वरील ऐच्छिक विषयापैकी कोणतेही चार विषय निवडता येतील.

## ♦ १२ वी कला :-

या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावीसाठी घेतलेलेच विषय घ्यावे लागतील.

## ♦ वाणिज्य विभाग (Commerce)

| वर्ग | प्रवेश क्षमता |
|---|---|
| **११ वी वाणिज्य** | अनुदानित=१२०<br>विना अनुदानित=१२० |

## ♦ ११ वी वाणिज्य : (Commerce)

वाणिज्य शाखांतर्गत अभ्यासक्रम मराठी माध्यमातून शिकविले जातात.

**अ) आवश्यक विषय**

१) इंग्रजी २) पर्यावरण शिक्षण ३) आरोग्य व शारिरिक शिक्षण

**ब) द्वितीय भाषा**

१) मराठी / हिंदी (यापैकी एक विषय निवडणे)

**क) ऐच्छिक विषय :**

१) अर्थशास्त्र २) पुस्तकपालन व लेखाकर्म
३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन ४) सचिवाची कार्यपद्धती किंवा सहकार

## ♦ १२ वी वाणिज्य :

इ. ११ वीसाठी घेतलेले विषय १२ वी वाणिज्यसाठी अभ्यासावे लागतील.

## ♦ विज्ञान विभाग :- (Science)

विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून शिकविला जाईल.

| वर्ग | प्रवेश क्षमता |
|---|---|
| ११ वी विज्ञान | अनुदानित =२४०<br>विना अनुदानित =२४० |

**अ) आवश्यक विषय**

१) इंग्रजी २) पर्यावरण शिक्षण ३) आरोग्य व शारीरिक शिक्षण

२) या अभ्यासक्रमाचे शिक्षण मराठी माध्यमातून दिले जाते.

३) इ.१२ वी इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पॉलीटेक्नीक द्वितीय वर्षात थेट प्रवेश.

४) इ. १२ वी इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी प्रथम वर्ष कला/वाणिज्य/विज्ञान/BBA/BCA/BCS/LLB शाखेत प्रवेश मिळण्यासाठी सोय. (तसेच D.Ed. व नर्सिंग अभ्यास क्रमास प्रवेश)

५) इ. १२ वी अकौंटींग ॲन्ड ऑफीस मॅनेजमेंट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी प्रथम वर्ष कला / वाणिज्य / LLB शाखेत प्रवेश मिळण्याची सोय.

६) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत व्यवसाय सुरु करण्यांत मार्गदर्शन.

७) शासनाच्या तसेच प्रायव्हेट लिमिटेड/पब्लिक लिमिटेड कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी.

♦ **शारीरिक शिक्षण** शरीरिक शिक्षण (P.E) हा विषय अभ्यासक्रमास आहे इयत्ता अकरावीतील विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण परीक्षा लेखी परीक्षेच्या अगोदर १५ दिवस घेवून त्यांना त्यामध्ये अे, बी, सी ग्रेड दिली जाते (धावणे, गोळाफेक, भालाफेक, लांब उडी, थाळीफेक इत्यादी खेळाचे प्रकार घेतले जातात.)

**टीप :** पर्यावरण शिक्षण व आंतरशाखीय विषय गटाचे प्रत्येकी एक लघू प्रबंध अथवा प्रकल्प / क्षेत्र अभ्यास उपक्रम प्रत्येक विद्यार्थ्यांस करणे आहेत व (आंतर शाखीय विषय गट प्रकल्प कार्य ऐच्छिक राहील)

## ♦ महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया :

प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी व पालकांनी संपूर्ण माहिती पुस्तिका काटेकोरपणे, सविस्तर वाचन करावे. त्यातील सर्व नियम मान्य व मजूर असतील तरच या महाविद्यालयात प्रवेध घ्यावा. आपणास महाविद्यालयाचे सर्व नियम मान्य आहेत असे गृंहीत धरुनच प्रवेश दिला जाईल. इयत्ता १० वीचा निकाल जाहीर झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून इयत्ता ११ वी ची प्रवेश प्रक्रिया सुरु होईल. गुणानुक्रमे प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना थेट व अंतिम प्रवेश दिला जाईल. तसेच विद्यार्थ्याला प्रवेश देण्याचा अगर नाकारण्याचा अंतीम निर्णय व अधिकार प्राचार्यांचा राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

## ♦ महाविद्यालयाची शाखा व आरक्षण निहाय प्रवेश क्षमता

शासन निर्णय शिक्षण विभाग क्र. एमआयएस-१०७४/१३०३ एम. दिनांक २७ जून १९९४ अन्वये मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार मागासवर्गीय व इतर मागासवर्गीयांना आरक्षणाच्या टक्केवारी प्रमाणे प्रवेश दिला जाईल. प्रथम प्रवेश अर्ज स्वीकारुन त्यांची छाननी करुन नंतर गुणवत्तेप्रमाणे यादी जाहीर केली जाईल. निवड यादीत नाव असल्यास मूळ प्रमाणपत्रे कार्लयात सादर करुन प्रवेश कायम करावा.

### ♦ आरक्षण व प्रवेश क्षमता दर्शविणारा तक्ता ♦

| अ.नं. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आरक्षण टक्केवारी | १३% | ०७% | ०३% | २.५% | ३.५% | ०२% | ०२% | १९% | ४८% | २ % |
| आरक्षण प्रवर्ग | एस. सी. | एस. टी. | एन. टी. (ए.)१/VJNT | एन. टी. (बी.)२/NT-1 | एन. टी. (सी.)३/NT-2 | एन. टी. (डी.)४/NT-3 | एस. बी. सी. | ओ.बी.सी. | खुला (ओपन) | समांतर आरक्षण बदली/आ.मा. ०५% सैनिक स्वा. सैनिक अपंग कला, क्रीडा समांतर आरक्षण |

ऊ) **शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नांवे समाज कल्याण कडून जमा झालेली कॉलेज फी ची रक्कम कॉलेजमध्ये त्वरीत भरणा करणे आवश्यक आहे. अन्यथा आपणांस पुढील वर्षास प्रवेश मिळणार नाही याची गांभिर्याने नोंद द्यावी.**

८) महाराष्ट्रात बाहेरुन येणाऱ्या विद्यार्थ्यांना (स्थलांतर प्रमाणपत्र) मायग्रेशन सर्टिफिकेट / अथवा पात्रता प्रमाणपत्र म.रा.मा. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांचेकडून मिळवावे लागेल.

९) ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड (Gap) पडलेला आहे, त्यांनी सदरील गॅपसाठी १०० रु. स्टॅम्प पेपरवर गॅप सर्टिफिकेट द्यावे.

१०) एकदा प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश घेतेवेळी दिलेली मूळ कागदपत्रे व त्याची एक सत्यप्रत परत मिळणार नाहीत.

११) विद्यार्थ्यांनी आवश्यक तेवढ्यां सत्यप्रती प्रवेश घेण्यापूर्वीच स्वत:कडे काढून ठेवाव्यात.

## ♦ प्रवेश रद्द करणेबाबत :

विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात एकदा प्रवेश घेतल्यानंतर त्याला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास

१) नियमानुसार महाविद्यालयाची प्रथम सत्राची संपूर्ण फी भरावी लागेल. प्रवेश घेतेवेळेस भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

२) प्रवेशाच्यावेळी देण्यात आलेली मूळ कागदपत्रे कोणत्याही सबबीवर परत केली जात नाहीत.

३) सदरील काळातील या महाविद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला देण्यात येईल.

४) प्रवेश रद्द केल्यानंतर विद्यार्थ्यांनी दाखला मागणीचा अर्ज कार्यालयात दिल्यानंतर तिसऱ्या दिवशी दाखला मिळेल.

५) दाखला मागणी अर्जावर खालील विभागाचे (न्यो डयुज) येणे बाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

१) कार्यालय २) ग्रंथालय ३) प्रशोगशाळा ४) वसतीगृह
५) जिमखाना ६) वर्ग शिक्षक ७) परीक्षा समिती इत्यादी

## ♦ प्रवेश शुल्काबाबत :

इयत्ता ११ वी व १२ वीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस भराव्या लागणाऱ्या शुल्काचा तक्ता स्वतंत्र जोडला आहे.

१) स्वाध्याय वह्यांचे व रेकॉर्ड बुक्सचे पैसे प्रवेश घेतेवेळी भरावे लागतील.

२) महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या तारखा प्रमाणे फीचे हप्ते न चुकता विद्यार्थ्यांनी भरावेत.

३) पालकांनी सुध्दा फी भरण्याबाबतची आपली जबाबदारी ओळखून काटेकोरपणे फी वेळेत भरावी लागेल.

४) पूर्ण फी भरणाऱ्या (पेईंग) विद्यार्थ्यासाठी दोन हप्त्यामध्ये फी भरण्याची सोय आहे.

५) शुल्क दर शासनाच्या आदेशाप्रमाणे बंधनकारक राहतील.

६) वसतिगृह भाडे दोन सत्रात भरता येईल.

## ♦ इ.बी.सी./पी.टी.सी./बी.सी./फ्रीशीप/एफ.एफ. ♦

### ● सवलत धारक विद्यार्थ्यासाठी शुल्क तक्ता ●

| अ.नं. | शुल्क विवरण / शाखा | कला | | वाणिज्य | | विज्ञान | | व्होकेशनल | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ग | ११ वी | १२ वी | ११ वी | १२ वी | ११ वी | १२ वी | ११ वी | १२ वी |
| १) | परीक्षा फी | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| २) | चाचणी फी | १०० | | १०० | | १०० | | १०० | |
| ३) | ओळखपत्र फी | २० | २० | २० | २० | २० | २० | २० | २० |
| ४) | ग्रंथ.अनामत | १० | | १० | | १० | | १० | |
| ५) | प्रयोगशाळा अनामत | | | | | १५ | | १५ | |
| ६) | वि. स. निधी | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ७) | ट्युटोरियल बुक | | | | | ७० | ७० | | |
| ८) | कॉलेज डेव्ह.फंड | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| | एकूण | ६६५ | ५५५ | ६६५ | ५५५ | ७५० | ६२५ | ६८० | ५५५ |

**११ वी कला/वाणिज्य [illegible]**
**द्वारे कळविली जाईल.**

## ♦ वसतिगृह प्रवेश शुल्क तक्ता ♦

(कनिष्ठ विभागाकडील सर्व शाखासाठी)

| अ.नं. | शुल्क विवरण | मुलींचे वसतिगृह |
|---|---|---|
| १) | प्रवेश फी | १००/- |
| २) | वसतिगृह पहिले सत्र | ५,०००/- |
| ३) | वसतिगृह दुसरे सत्र | ३,७००/- |
| ४) | देखभाल निधी | १,२००/- |
| | **एकूण** | **१०,०००/-** |

♦ **अनामत रक्कम** (Deposits)

१) महाविद्यालय सोडल्यापासून तीन वर्षांच्या मुदतीनंतर अनामत रक्कम परत दिली जाणार नाही.

२) अनामत रक्कम परत मागणीच्या अर्जासोबत अनामत पावती जोडणे आवश्यक आहे.

३) महाविद्यालय सोडल्यानंतर १५ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर या काळातच अनामत [illegible] परत केली जाईल.

४) अनामत रक्कम परत मागणीचा अर्ज कार्यालयात दिल्यानंतर नियम - १, २, ३ ची पूर्तता झाल्यानंतर तीन दिवसांनी अनामत रक्कम परत मिळेल.

♦ **अत्यंत महत्वाचेः** सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती व ईबीसी धारक विद्यार्थ्यांनी त्यांचे शिष्यवृत्ती सवलतीचे /ईबीसीचे अर्ज मुदतीत ऑनलाईन भरुन हार्डकॉपी कार्यालयात वेळेत जमा करणे बंधनकारक राहील अन्यथा सबंधित विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाची संपूर्ण फीस भरावी लागेल.

जाते. ही शिष्यवृत्ती स्वीकारल्यानंतर अन्य कोणतीही शिष्यवृत्ती स्वीकारता येत नाही. अर्जासोबत उत्पन्नाचा दाखला, एस.एस.सी. गुणपत्रक एक फोटो, जोडावे लागतात. प्रथम मंजूर झाल्यानंतर नूतनीकरणाने पदवी शिक्षणक्रमापर्यंत ही शिष्यवृत्ती मिळते.

**२) राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती :**

ही शिष्यवृत्ती ९० टक्केपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांना मिळते. राष्ट्रीयकृत बँकेतर्फे मिळते. परंतु परत फेड करावी लागते.

**३) राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती :**

एस. एस. सी. परीक्षेत ६० टक्यापेक्षा अधिक गुण ज्या विद्यार्थ्याला मिळाले असतील त्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. ही शिष्यवृत्ती गुणानुक्रमे दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही. ही ११ वी / १२ वी साठी मिळते.

**४) टॅलेंट डेव्हलपमेंट इन मॅथ्स ॲण्ड सायन्स शिष्यवृत्ती** यासाठी शासनाच्या नियमाप्रमाणे विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना अर्ज करता येतो.

**५) अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती :**

शारीरिक अपंगत्व अथवा व्यंगत्व झालेल्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. एस. एस. सी. परीक्षेस किमान ४० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविलेलया व ज्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. २४०००/- पेक्षा कमी आहे, अशा अपंग विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. अर्जासोबत व्यंग स्पष्ट दिसेल अशा फोटो, जन्म तारेखचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रीकेची सत्यप्रत, मेडीकल सर्टिफिकेटस जोडावे लागतात. ३१ जुलैपर्यंत अर्ज करावा लागतो.

**६) भारत सरकारची मागासवर्गीय शिष्यवृत्ती** ( बी.सी. स्कॉलरशीप/बी.सी.फ्रीशीप) जे विद्यार्थी एस.सी.,एस.टी.,एन.टी,-१,२,३,४, व ओ.बी.सी. आणि एस.बी.सी. जातीचे संवर्गातील असतील त्यांना ही स्कॉलरशीप मिळते. भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना खालील नियमांची व कागदपत्रांचीपू पूर्तता करणे गरजेचे आहे.

१) या महाविद्यालयात प्रवेश घेतला पाहिजे.
२) ११ वीसाठी नवीन ऑन लाईन अर्ज करावा लागेल. तसेच ३१ ऑगस्टपूर्वी ऑन लाईन अर्ज करावा.
३) ऑन लाईन अर्जातील सर्व रकाने भरले पाहिजेत.
४) उत्पन्नाचा दाखला (मागील आर्थिक वर्षाचा) तहसीलदार यांच्या सहींचा असावा.
५) शाळा सोडल्याच्या, दाखल्याची सत्यप्रत, एस.एस.सी. गुणपत्रकाची सत्यप्रत, जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत, कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) वडिलांचे वार्षिक उत्पन्न (एस.सी.) रु. २,००,०००/-व इतर ८,००,०००/- पेक्षा कमी असल्यास पूर्ण स्कॉलरशीप मिळते.
७) विद्यार्थी शासकीय मुलाचे/मुलीचे वसतीगृहामध्ये राहत असल्यास तसा दाखला जोडणे आवश्यक आहे.
८) प्रवेश घेतल्या तारखेपासून वार्षिक परीक्षेच्या कालावधीपर्यंतच स्कॉलरशीप मिळते.
९) एका कुटुंबातील दोनपेक्षा अधिक मुलाना शिष्यवृत्ती मिळणार नाही.

**८) मुलींना मोफत शिक्षण सवलत:**

महाराष्ट्र शासनाने मुलींना मोफत शिक्षण जाहीर केलेले आहे. त्यासाठी विद्यार्थीनीने प्रवेश अर्जासोबत विहित नमुन्यातील कुटुंब प्रमाणपत्र, अपत्य प्रमाणपत्र, प्रतिज्ञा पत्र, जोडावे. त्यासोबत ई.बी.सी. अर्ज जोडू नयेत. ज्या विद्यार्थीनींना इतर कोणतीही शैक्षणिक सवलत मिळणार नाही, त्यानी यासाठी अर्ज करावा.

**९) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना मिळणारी फी सवलत :**

:(पी.टी.सी.) ज्या विद्यार्थ्यांचे पालक प्राथमिक शिक्षक असतील व ज्यांना या सवलतीसाठी अर्ज करावयाचा असेल, त्यांनी प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

१) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना मिळणाऱ्या सवलतीचा अर्ज दोन प्रतीत.
२) नोकरीचा दाखला (मा.शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीचा) दोन प्रतीत.
३) कुटुंबमर्यादा प्रमाणपत्र दोन प्रतीत.
४) गुणपत्रकांची सत्यप्रत दोन प्रतीत.

**१०) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत :**

राज्यातील अनुदानीत अशासकीय माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिक्षणाच्या सर्व स्तरावर (इयत्ता १ ली ते पदव्युत्तर) नि:शुल्क शिक्षण मिळते.

१) विहीत नमुन्यातील अर्ज दोन प्रतीत.
२) नोकरीचा दाखला (माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरीचा) दोन प्रतीत.
३) कुटुंबमर्यादा प्रमाणपत्र दोन प्रतीत.
४) गुणपत्रकांची सत्यप्रत दोन प्रतीत.

**११) माजी सैनिक / स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला - मुलींना मिळणारी फी सवलत.**

ज्या विद्यार्थ्यांचे पालक माजी सैनिक किंवा स्वातंत्र्य सैनिक आहेत, अशा विद्यार्थ्यांना ही सवलत मिळते.

१) विहित नमुन्यातील ही सवलत मिळते. २) सन्मानपत्राच्या दोन सत्यप्रती
३) गतवर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र ४) पालकांचा करारनामा व अपत्यप्रमाणपत्र
५) गुणपत्रकांची सत्यप्रत ६) माजी सैनिक कार्यालयाची सही

**१२) विद्यार्थी सहाय्यक निधी :**

महाविद्यालयात विद्यार्थी सहाय्यक निधी कार्यान्वित असून त्यातून गरीब, होतकरु, हुशार विद्यार्थ्यांना लेखी विनंती अर्जानुसार सहाय्य केले जाते.

५) **गणवेश** :महाविद्यालयाने सुचविलेला गणवेश नियमितपणे परिधान करणे विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील. अन्यथा दंडात्मक कार्यवाही होईल. गणवेशाच्या कपडयांचा रंग महाविद्यालय सुचवील त्याप्रमाणे घ्यावा लागेल. विद्यार्थीनींनी सलवार–कमीज व दुपट्टा या पोशाखात यावे तसेच दुपट्टा आवश्यक आहे.

६) **निवडणूक** :कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व वर्ग प्रतिनिधींची निवड गुणवत्तेनुसार केली जाईल.

७) **क्रीडांगण व क्रीडा स्पर्धा** : सर्व प्रकारच्या क्रीडांना उपयुक्त असे प्रशस्त व विशाल क्रीडांगण महाविद्यालयाच्या समोरच आहे. तसेच देशी–विदेशी खेळांच्या सरावाची सोय आहे. त्यामुळे तरुण – तरुणीं क्रीडापटूंना आपले भवितव्य क्रीडा क्षेत्रात उज्वल करण्यास भरपूर वाव आहे.

१) आंतर महाविद्यालयीन स्पर्धा, तालुका स्तरीय, जिल्हास्तरीय, विभागीय आणि राज्य पातळीवर आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धासाठी महाविद्यलायाचा संघ पाठविला जातो.

२) एखाद्या स्पर्धेसाठी खेळाडू किंवा संघ पाठवावयाचा झाल्यास त्या खेळाडूची व संघाची तयारी, दर्जा पाहून पाठविले जाते.

३) क्रीडा विभागातील निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

४) खेळाडू म्हणून कोणत्याही प्रकारची अशैक्षणिक सवलत मिळणार नाही.

५) क्रीडा स्पर्धा सोडून इतर दिवशी खेळाडूंना महाविद्यालयांच्या तासांना, परीक्षेला व प्रात्यक्षिकांना गैरहजर राहता येणार नाही.

६) शरीर सौष्ठव व संवर्धन केंद्र तसेच मल्टीजिमची सोय उपलब्ध.

८) **वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेह संमेलन :-**

विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या विविध कला गुणांना व सुप्त गुणांना वाव देण्यासाठी वार्षिक पारितोषिक वितरण हे जानेवारी महिन्यात साजरे केले जाते.

१) कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून गॅदरींग फी घेतली जात नाही.

९) **महाविद्यालयीन नियतकालिक :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सृजनशिलतेला चालना देण्यासाठी व रसग्रहण, आकलन, मर्मज्ञता समीक्षणदृष्टी वाढावी यासाठी महाविद्यालया मार्फत "**विवेकानंद**" नावाचा वार्षिकांक काढण्यात येतो. तसेच "गुलमोहर" नावाच्या भित्तीपत्रिकेचा अंक दि.८ ऑगस्ट, १५ ऑगस्ट, १२ ते १९ जानेवारी विवेकानंद जयंती सप्ताहनिमित्त, २६ जानेवारी या दिवशी प्रकाशीत केला जातो. यामध्ये नवीन साहित्यिकांना वाव मिळतो. तसेच कथा, कविता, वैचारिक लेख, समीक्षा, व्यंगचित्रे, रांगोळी चित्रे, विनोदलेख, चुटके इत्यादींना प्राधान्य दिले जाते.

१०) **शैक्षणिक सहली :**

महाविद्यालया तर्फे केवळ अभ्यासक्रमावर आधारीत विविध विषयाच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते.

४) डी.एड्.,अंगणवाडी, प्रशिक्षण कोर्ससाठी प्रवेश घेताना १ टक्के गुणांत वाढ मिळते.

५) गणतंत्र दिवस, प्रजासत्ताकदिन, संचलनात सहभाग घेता येतो.

**१७) वसतिगृह :-**

महाविद्यालयाचे स्वत:च्या मालकीचे भव्य दोन मजली इमारत असलेले वसतिगृह असून मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे आहेत. मुलांच्या साठी "**डॉ. बापूजी साळुंखे**" या नावाने मुलांचे वसतिगृह आहे. सर्व सोयींनी युक्त, प्रशस्त व प्रसन्न वातावरण असलेले आणि अतिशय माफक भाडे असलेले, वसतिगृह आहे.

१) वसतिगृहात २५ विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळेल.

२) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला वसतिगृहाचे नियम बंधनकारक राहतील.

३) वसतिगृहात गरीब, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

४) वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुविधांकडे लक्ष ठेवण्यासाठी एका प्राध्यापकांची '**रेक्टर**' म्हणून नेमणुक केलेली आहे.

५) "**संस्थामाता श्रीमती सुशीला देवी साळुंखे**" या नावाने मुलींच्या साठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय करण्यात आलेली आहे.

६) वसतिगृहाच्या फी संदर्भात स्वतंत्र तक्ता पान नं. १० वरती दिलेला आहे.

**१८) संगणक केंद्र :**

महाविद्यालयात कनिष्ठ वर्गासाठी स्वतंत्र असे संगणक केंद्र असून, त्यांच्या उपयोग माहिती तंत्रज्ञान या अभ्यासक्रमासाठी तसेच शॉर्ट टर्म प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी केला जातो.

**१९) गुणवत्ता विकास विभाग :**

हा विभाग संस्थेच्या विद्यासमिती अंतर्गत सन १९९४-९५ पासून राबविला जात आहे. इयत्ता १२ वी कला, विज्ञान, वाणिज्य, व्होकेशनल मधील विद्यार्थ्यासाठी ही योजना असून, प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींना बंधनकारक आहे. सदर योजनेचा विस्तार तपशील शिक्षक-पालक-विद्यार्थी मेळावा घेवून स्पष्ट केला जाईल.

◆ **गुणवत्ता विकास योजनेची वैशिष्ट्ये :**

१) प्राचार्य, पर्यवेक्षक, तज्ञ प्राध्यापक यांचे अभिप्राय पर व्याख्यान.

२) वर्षभरात १ "विद्यार्थी-शिक्षक-पालक" मेळाव्याचे आयोजन केले जाते. पहिला मेळावा शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस तर दुसरा मेळावा द्वितीय सत्र सुरु झाल्यावर पहिल्या आठवड्यात घेतला जाईल.

३) इयत्ता १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनलसाठी उन्हाळी वर्गाची सोय.

४) अभ्यासविषयक विविध विषयांच्या शंका निरसन केल्या जातात.

५) वरील सर्व परीक्षांच्या आदर्श नमुना उत्तरपत्रिकांची उपलब्धता

६) नियमित सहामाही व पूर्व परीक्षा सोडून ३ जादा सराव परीक्षा बोर्ड पॅटर्नप्रमाणे घेतल्या जातात.

७) प्रत्येक शाखेतून २० गुणवंत विद्यार्थी निवडले जावून त्यांच्या पुन्हा ३ जादा सराव परीक्षा बोर्ड पॅटर्न प्रमाणे घेतल्या जातात.

## २१) प्रयोगशाळा :

महाविद्यालयातील विज्ञान विभागासाठी स्वतंत्र अशी अद्ययावत व सुसज्ज प्रयोगशाळा असून, त्यात नळाच्या पाण्याची, विजेची आणि गॅसची व्यवस्था आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, पीकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान या विषयाच्या वेगवेगळ्या प्रयोगशाळा आहेत.

## २२) ● ग्रंथालय

आज रोजी ग्रंथालयात ९४,७८१ एवढे ग्रंथ असून शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये २३६ ग्रंथ खरेदी केलेले आहेत. ग्रंथालयात १९ नियतकालिके, स्पर्धा परीक्ष, संकीर्ण आणि चालू घडामोडीवर आधारित नियतकालिके तसेच १६ वर्तमानपत्रे मागविली जातात. ग्रंळालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच माजी विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक यांना ग्रंथालयामार्फत विविध वाचन सेवा-सुविधा उपलब्ध कारुन दिलेल्या आहेत. तसेच स्पर्धा परीक्षेसाठी लागणारे अद्यावत वाचन साहित्य ग्रंथालयात उपलब्ध असून वाचन साहित्य ग्रंथालयात उपलब्ध असून वाचक त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत ७५ मुले आणि ७५ मुली अशी एकूण १५० विद्यार्थी बसू शकतात. त्यांची उपस्थीती संगणका मार्फत नोंद्विली जाते. अभ्यासिका ही निवासी विद्यार्थ्यांसाठी रात्री १० वाजेपर्यंत सुरु असते. ग्रंथालयातील संपूर्ण ग्रंथालयाच्या नोंदी या स्लिम-२१ या आज्ञावली वर केलेल्या असून ग्रंथावर बारकोड प्रणालीच्या सहाय्याने ग्रंथ देवघेव सेवा दिली जाते. वेब ओपॅक च्या मदतीने वाचक अपल्याला हवे असलेले पुस्तक / ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहे कि नाही हे २४*७/३६५ दिवस बघू शकतात.

**अ) अभ्यासिका** : महाविद्यालयात दिवसा व रात्री अभ्यासिकेची स्वतंत्र सोय उपलब्ध करण्यात आलेली आहे.

१) **दिवस अभ्यासिका** : १) दिवसा विद्यार्थी / विद्यार्थीनींना तासा व्यतिरिक्त अभ्यासिकेमध्ये बसून मनसोक्त वाचन, मनन व चिंतन करता यावे म्हणून ग्रंथालय इमारतीच्या वरती सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अभ्यासिकेची सोय केलेली आहे. २) ऑफ तासाला अभ्यासिकेशिवाय विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात इतरत्र कोठेही बसू नये.

२) **रात्र अभ्यासिका** : १) रात्र अभ्यासिका द्वितीय सत्राच्या काळात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायंकाळी ६.०० ते १०.०० वाजेपर्यंत उघडी राहील. २) गुणवत्ता विकास विभागाच्या निवडक विद्यार्थ्यांना स्वतंत्र रात्र अभ्यासिकेची सोय आहे. ३) रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशी अभ्यासिका बंद राहील. ४) रात्र अभ्यासिकेत क्रमिक पुस्तके वाचनासाठी मिळतील; पण घरी जाताना परत करावीत, अन्यथा दंड आकारण्यात येईल. ५) अभ्यासिकेत ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांशी उध्दट बोलणे, आज्ञा न पाळणे, ओळखपत्र जवळ न बाळगणे इतर विद्यार्थ्यांबरोबर बोलणे, हे बेशिस्त वर्तन समजून त्या विद्यार्थ्यांस अभ्यासिकेसाठी मज्ञाव केला जातो.

**ब) पुस्तक पेढी :**

१) इयत्ता ११ वी व १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल वर्गाच्या विद्यार्थ्यांना पुस्तकपेढीची सोय आहे. केवळ रु. एक तृतीयांश शुल्क आकारुन वर्षभरासाठी स्वतंत्र पुस्तकांचा संच दिला जातो.

२) पुस्तक पेढीतून पुस्तके घेण्यासाठी प्रवेश शुल्कपावती, ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

३) विनाकारण व्हरांड्यात रेंगाळू नये.
४) या महाविद्यालयातील विद्यार्थ्याने बाहेरील विद्यार्थ्यांस, मित्रांस आणू नये.
५) विद्यार्थ्याने महाविद्यालयीन आवारात पान, तंबाखू, मावा, गुटखा, खावून थूंकणे किंवा तत्सम पदार्थांचे सेवन करण्यास कायद्यानेच बंदी आहे.
६) प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या वर्गात तासाला व प्रात्यक्षिकांना वेळेवर उपस्थित रहावे.
७) महाविद्यालयीन मालमत्तेचे नुकसान होईल असे वर्तन व कृत्य करु नये.
८) विद्यार्थी व विद्यार्थीनी समुहाने वर्गातील अध्यापनास बाधा येईल असे गैरवर्तन करु नये.
९) क्र. ७ व ८ नियमानुसार कोणतीही कृती दंडास व भरपाईस पात्र आहे.
१०) विद्यार्थ्यांनी विद्यार्थीनीशी अशोभनीय (छेडछाड) प्रकारचे वर्तन करु नये.
११) विद्यार्थ्यांनी आपल्या जवळ दुसऱ्यांना इजा होइल व दहशत निर्माण होईल असे शस्त्र बाळगू नये.
१२) गटबाजी करणे, गोंधळ करणे, भांडण करणे, सामुहिक सुट्टी घेणे, प्राध्यापकांशी उद्धट वर्तन करणे, आज्ञाभंग करणे, असे प्रकार बेशिस्त वर्तन समजून कायदेशीर कार्यवाही केली जाईल.
१३) महाराष्ट्र शासन निर्णयानुसार **"रॅगिंग"** दखलपात्र गुन्हा आहे.
१४) आपले तास संपल्यानंतर विद्यार्थ्याने पॅसेजमध्ये, गेटमध्ये, सायकल स्टँडमध्ये, वर्गात अथवा आवारात गप्पा मारीत थांबू नये. सरळ घरी निघून जावे, अथवा आवाराच्या बाहेर पडावे.
१५) महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम करताना विद्यार्थ्यांनी प्राचार्यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
**१६) शासन आदेशानुसार महाविद्यालय परिसरात मोबाईल वापर करण्यास बंदी आहे तरी विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरु नये, वापरलेचे निदर्शनास आल्यास तात्काळ ५०/- रुपये दंडात्मक कारवाई केली जाईल.**
**१७) महाविद्यालयातील सर्व परीक्षेस उपस्थित असणे अनिवार्य आहे, जे विद्यार्थी गैरहजर राहतील अशांना दंडात्मक कारवाई केली जाईल.**
१८) महाविद्यालयाच्या उपस्थिती व शिस्ती संबंधीची नियमावली मी काळजीपूर्वक वाचली असून, तिचे मी तंतोतंत पालन करीन. तसेच शिस्त पालन समितीचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील, याची मला जाणीव आहे.

वरील सर्व नियम आपणास व आपल्या पाल्यांस मान्य आहेत, असे समजून महाविद्यालयात प्रवेश दिला जाईल.

**शै.वर्षे-शासन व विद्यापीठ आदेशानूसार कोरोना प्रार्दूभावाच्या पार्श्वभूमीवर जे धोरण निश्चिंत होईल त्याप्रमाणे चालू शै.वर्षे राहील.**

**डॉ. जयसिंगराव श्रीराम देशमुख**
प्राचार्य,
रा.प.महाविद्यालय,उस्मानाबाद.

# * शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद *

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.लोकरे डी.एम. | प्रबंधक |
| २ | श्री.पिंगळे एस.एस. | मुख्य क्लार्क |
| ३ | श्री.देशमुख एन.बी. | ग्रंथालय लिपीक |
| ४ | श्री.घोडके एस.व्ही. | प्रयोग शाळा परिचर |
| ५ | श्री.आत्तार ए.एल. | प्रयोग शाळा परिचर |
| ६ | श्रीमती शेलार शु.आर. | प्रयोग शाळा परिचर |
| ७ | श्री.जगताप आर.आर. | प्रयोग शाळा परिचर |
| ८ | श्री.मुळे बी.डी. | प्रयोग शाळा परिचर |
| ९ | श्री.सासवे डी.एल. | प्रयोग शाळा परिचर |
| १० | श्री.व्हटकर एम. | क.लिपीक/विनाअनुदान |
| ११ | श्री.कवडे एन. आर. | कनिष्ठ लिपीक/विना अनुदान |
| १२ | श्री.केदार बी. व्ही. | कनिष्ठ लिपीक/विना अनुदान |
| १३ | श्री.केदार व्ही.आर. | शिपाई |
| १४ | श्री.धिंमधिमे आर.वाय. | शिपाई |
| १५ | श्री.शेख बी.एफ. | शिपाई |
| १६ | श्री.सनेर एम.एस. | शिपाई |
| १७ | श्रीमती गायकवाड एस.जे. | शिपाई |
| १८ | श्री.माळी डी.एम. | शपाई / विनाअनुदान |
| १९ | गायकवाड ए.आर. | शिपाई / विनाअनुदान |
| २० | | |
| २१ | | |
| २२ | | |
| २३ | | |
| २४ | | |
| २५ | | |
| २६ | | |
| २७ | | |
| २८ | | |
| | | |

## पोहोच पावती

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

–शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद.

### सन २०२३ –२०२४

श्री/कु. ______________________ यांचा इ. ११ वी १२ वी.

विज्ञान / कला / वाणिज्य / व्होकेशनल केलेल्या प्रवेश अर्ज आज दि.   /   /२०२३ रोजी मिळाला.

संवर्ग:–

अर्ज क्रमांक:–

एकूण गुण :–

एकूण टक्केवारी :–

सदस्य
प्रवेश समिती

प्रमुख
प्रवेश समिती


ग्रंथालय


SCIENCE BUILDING